ग्रामपंचायत अधिकारी या संवर्गातील
अस्थायी कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र
उपलब्ध करुन देणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग २
साप्रवि-२/ग्रापं-१८२९/२०२५
दिनांक -३१/१०/२०२५

वाचा :- १.शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र एसआरव्ही/१०७५/१० दि.१९/९/१९७५
२.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र स्थाप्रप-१४१४/(प्र.क्र. ७३/१४)/ १३-अ दि.११ सप्टेबर २०१४.
३.सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. स्थाप्रप्र-१४१५/(प्र.क्र.९७/१५) १३-अ दि.२१/०८/२०१५
४.सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. स्थाप्रप्र-१४१५/(प्र.क्र.१४/१५) १३-अ दि.१९/०९/२०१७
५.सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. स्थाप्रप्र-१४२५/४०(प्र.क्र.११/२०२५) का. सेवा ४ दि.११/०६/२०२५

महाराष्ट्र शासनाचे संदर्भीय निर्णयात / परिपत्रकात नमुद केलेनुसार प्रत्येक अस्थायी शासकीय कर्मचार्यस स्थायित्व प्रमाणपत्र प्रथम पदावरील नियुक्तीच्या संदर्भात देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करुन त्यामधील सुचनांचा एकत्रित विचार करुन स्थायित्च प्रमाणपत्र देण्यासंदर्भात पुढील सुचना दिलेल्या आहेत.

प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण करणाया व पुढील शर्तीची पूर्तता करीत - यांना स्थायीत्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे त्यानुसार जिल्हा परिषदे -असलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा अंतर्गत गट क व गट ड मधील पात्रअस्थायी कर्मचायांच्या बाबतीत संबधीत कार्यालय प्रमुखाने स्थायित्व - .प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे त्याबाबत खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील

१. कर्मचाऱ्याची नियुक्ती सेवा प्रवेश नियमानुसार व विहित पध्दतीने होणे,

२. कर्मचारी सेवेस पात्र असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र असणे व कर्मचाऱ्याने सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण होणे.

३. कर्मचाऱ्याचा सेवाभिलेख (उदा. गोपीनीय अहवाल, उपस्थिती, सचोटी इ.) चांगला असणे.

<u>स्थायित्व प्रमाणपत्राचा नमुना</u>

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, शासन परिपत्रक क्रमांक-स्थाप्रप्र -: ४-सेवा.का/(२०२५/११.क्र.प्र)/४०/१४२५, दिनांक ११ जून २०२५ मधील सूचना क्रमांक १ येथे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती खाली नमुद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचायांच्या बाबतीत पूर्ण -

झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी आवश्यक त्या सर्व प्रयोजनार्थ त्यांच्या नावासमोर स्तंभ -३ मध्ये नमुद केलेल्या पदावर स्तंभ-४ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन स्थायी शासकीय कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास पात्र आहेत.

| अ क्र | शासकीय कर्मचाऱ्याचे नाव व सध्याचे पदनाम | ज्या पदावर स्तंभ क्र.२ मधील कर्मचाऱ्यास स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम | कोणत्या दिनांकापासून देण्यात आले |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कै.विनोद हरिभाऊ ससाणे, ग्रामपंचायत अधिकारी | ग्रामसेवक | २४/०४/२०२१ |
| २ | श्री.गणपत संभा धाडवे, ग्रामपंचायत अधिकारी | ग्रामसेवक | २६/१२/२०२१ |

वरील प्रमाणे पुर्वीच्या पदावर ३ वर्षाची नियमीत सेवा पुर्ण करणाऱ्या पात्र अस्थायी कर्मचाऱ्यास व उक्त नमुद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यास संदर्भ क्र.३ नुसार मला दिलेल्या अधिकारानुसार स्थायित्वाचे प्रमाणपत्र देणेत येत आहे. सदर प्रमाणपत्राची संबंधीत कर्मचाऱ्याचे मुळ सेवा पुस्तकात नोंद घेणेपुर्वी उक्त अटी व शर्तीची पुर्तता संबंधीत कर्मचारी करीत असल्याबाबतची शहानिशा कार्यालय प्रमुख यांचेकडून संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकावरुन करुन घेणेत यावी व त्यानंतरच सदर प्रमाणपत्राची नोंद घेणेत यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.202510300060151 असा आहे.

Signed by
Dadabhau Namdeo Gunjal
Date: 30-10-2025 15:48:55
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.गणपत संभा धाडवे, ग्रामपंचायत अधिकारी,पंचायत समिती पारनेर
द्वारा - गटविकास अधिकारी,पंचायत समिती पारनेर

प्रत - गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा/पारनेर
प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि प अहिल्यानगर.